## संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०९३/२०१८ मधील निशाणी क्र. ६८ वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा आरोपीच्या वकीलांनी आरोपीच्या गैरहजेरीत दाखल केलेला आहे. फिर्यादीचा पुरावा संपल्यानंतर नविन कागदपत्र दाखल केल्यामुळे त्या कागदपत्राबाबत उलटतपास घेणे आवश्यक असल्यामुळे त्या कागदपत्रांबाबत फिर्यादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्याची विनंती प्रस्तुत अर्जात केली आहे. परंतु, फिर्यादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करुन अर्जास जोरदार हरकत घेतली.

**०२.** अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०३.** प्रस्तुतचे प्रकरण हे सन २०१८ साली दाखल करण्यात आले असुन रोजनाम्याचे अवलोकन केले असता आरोपी हा वारंवार न्यायालयासमोर गैरहजर असल्याचे दिसुन येते. ब—याच कालावधीपासुन प्रकरण हे आरोपीच्या वॉरंटकरिता प्रलंबित होते. त्यानंतर आरोपी हा न्यायालयात हजर झाला व त्याचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. त्यानंतर फिर्यादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, यापुर्वी दिनांक ०२/११/२०२३ रोजी आरोपी व त्यांचे वकील गैरहजर असल्यामुळे उलटतपास नाहीबाबत आदेश पारित करण्यात आला होता. त्यानंतर आरोपीने निशाणी ४६ कडे उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. सदरचा अर्ज रक्कम रुपये २०००/— खर्चासह मंजुर करण्यात आला. सदरची रक्कम आरोपीने न भरल्यामुळे तो अर्ज पुन्हा नामंजुर करण्यात आला. त्यानंतर पुन्हा आरोपीने त्याच्याविरुद्ध काढलेले अजामीनपत्र वॉरंट रद्द करुन उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. सदरचा अर्ज मंजुर करण्यात आला व त्यानंतर आरोपीतर्फे फिर्यादीचा उलटतपास घेण्यात आला. त्यानंतर फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ०२ नामदेव लक्ष्मण पवार व साक्षीदार क्र. ०३ चेनसिंग प्रेमसिंग पवार यांच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर प्रकरण फिर्यादीचे साक्षीदार क्र. ०२ व ०३ यांच्या उलटतपासाकरिता प्रलंबित असतांना आरोपीतर्फे निशाणी क्र ६५ कडे दस्तऐवज न्यायालयात दाखल करण्याबाबतची सुचना फिर्यादीस देण्यास परवानगी मिळण्याबाबत अर्ज सादर करण्यात आला. त्या

अर्जासोबत जे कागदपत्र दाखल करावयाचे आहेत त्या कागदपत्रांची यादी आरोपीने दिली. सदर अर्ज व नोटीस अन्वये आरोपीने त्यातील नमुद कागदपत्र न्यायालयात दाखल केले आहेत.

**०४.** फिर्यादीने त्याच्या उलटतपासामध्ये कोणते कागदपत्र न्यायालयात दाखल केले व त्याला कोणत्या कागदपत्राबाबत उलटतपास पुन्हा घ्यावयाचे आहे याबाबतचा कोणताही स्पष्ट उल्लेख प्रस्तुत अर्जात करण्यात आलेला नाही. तसेच फिर्यादीने त्याच्या पुराव्यानंतर काही कागदपत्र दाखल केल्यास ते सिध्द करण्याची जबाबदारी त्याच्यावर राहील. आजरोजी फिर्यादीचा उलटतपास पुन्हा घेण्यास परवानगी दिल्यास त्याअन्वये त्रृटी भरुन काढण्याची परवानगी दिल्यासारखे होईल.

**०५.** आजरोजी साक्षीदार क्र. ०२ व ०३ हे त्यांच्या उलटतपासाकामी न्यायालयात हजर आहेत. आरोपीचा सकाळी ११.०० वाजेपासुन पुकारा केल्यानंतर तो १२.४५ वाजेपर्यंत न्यायालयात हजर झालेला नाही अथवा त्याच्या हजेरी माफीचा अर्ज सादर करण्यात आलेला नाही. प्रस्तुत अर्ज सादर केल्यानंतर आरोपीच्या वकीलांनी त्या अर्जावर सुनावणी करण्याकरिता पुढील तारीख देण्याची विनंती केलेली आहे. प्रकरणाचे एकंदरीत रोजनाम्याचे अवलोकन केले असता आरोपीतर्फे प्रकरणात जाणीवपुर्वक विलंब करण्यात येत असल्याचे दिसुन येते. प्रकरणाची सुनावणी लांबणीवर टाकण्याकरिता आरोपीतर्फे वारंवार अर्ज सादर करण्यात येत असल्याचे दिसुन येते. अर्जात कोणतेही तथ्य नसल्यामुळे सदरचा अर्ज खारीज करण्याच्या योग्यतेचा असल्याचे माझे मत आहे. करिता खालिल आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**.

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

SUBHASH DATTARAO TARE

Digitally signed by SUBHASH DATTARAO TARE
Date: 2026.01.16 17:41:13 +05'30'

मंगरुळपीर
दिनांक :– १६/०१/२०२६

(सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
२ रे न्यायालय, मंगरुळपीर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | :- | R. T. Sharma (Junior Clerk) |
| Date of Judgment | :- | 16.01.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 16.01.2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 16.01.2026 |